# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

जा.क्र.: मनपा / पे ॲण्ड पार्क / १८ / २०१८-१९ दिनांक : 23/5/2018

प्रति,
मे.संतोष इंटरप्रायजेस,
बी-६,३०१, युनिक कॅस्टल,
शांती पार्क, मिरारोड (पू).

विषय : मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) आरक्षण क्र.१८४ मिरारोड रेल्वेस्टेशन जवळ, मिरारोड (पू). व (बी) - मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेस मुदतवाढ देणे

संदर्भ : १. या कार्यालयातील कार्यादेश जा. क्र. मनपा/पे ॲन्ड पार्क/१०/२०१७-१८, दि. ३१/०५/२०१७.
२. आपणाबरोबर दि. ३१/०५/२०१७ रोजी झालेला करारनामा.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनूषंगाने आपणास कळविण्यात येते की, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) आरक्षण क्र.१८४ मिरारोड रेल्वेस्टेशन जवळ, मिरारोड (पू). येथे व (बी) - उपरोक्त पे ॲन्ड पार्क लगत (वाहनतळ) येथील मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅडींगजवळ) येथिल वाहनतळ ठेकापध्दतीने चालविणेबाबत आपणास संदर्भ क्र. १ च्या कार्यादेशान्वये देण्यात आलेला आहे.

सदर ठेक्याची मुदत दि. ३१/०५/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सदर कामी नविन निवीदा काढण्याची प्रक्रिया प्रस्तावीत आहे. परंतू सदर कालावधीत भारत निर्वाचन आयोग यांनी कोकण पदविधर मतदार संघाचा निवडणुक कार्यक्रम जाहिर केला असल्यामुळे आदर्श आचारसंहिता दि. २४/०५/२०१८ ते ०२/०७/२०१८ पर्यंत जाहिर केलेली असल्याने सदर कामाचे कार्यादेश पुढिल निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत आपल्या सदरहू कामाच्या करारास पुढिल अटीशर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

१. यापुर्वी आपण महानगरपालिकेशी दि. ३१/०५/२०१७ रोजी केलेल्या करारातील अटी शर्ती कायम रहातील.
२. यापुर्वी सादर केलेली बँक गॅरेंटी सुरक्षा अनामत रक्कम पुढिल मुदत संपेपर्यंत महानगरपालिकेकडे राहील.
३. मा. महासभा दि. ०८/१२/२०१७, ठराव क्र. ३४ मध्ये दिलेल्या दरानुसार मुल्याधिकारीक रक्कमेवर १० टक्के वाढिव महसूल रक्कम दि. ०१/०६/२०१८ पासून भरणा करावी या अनुषंगे दरमहा महसूल रक्कम रु. ११,३६,४९२/- एवढी होत असून प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत सदर रक्कमेचा भरणा करणे आपणास बंधनकारक राहील.
४. सदरहू कामाचे कार्यादेश पुढिल निविदेची प्रक्रीया पुर्ण होऊन संबंधीत एजन्सिना देईपर्यंत कामाच्या कराराची मुदत वैध राहील. तदनंतर आपणास सदरहू वाहनतळाची जागा त्वरीत महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

उप-आयुक्त (पे ॲन्ड पार्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका.